डॉक्टरांनी आपले नोंदणीप्रमाणपत्र
दवाखान्यात लावण्याविषयी

**महाराष्ट्र शासन**
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन परिपत्रक क्र.एएसएन २००३ /प्र.क्र.१८३ /०३ /अधिनियम
मंत्रालय, मुंबई
दि. २ जुलै २००३.

**परिपत्रक -** ॲलोपॅथीतील, आयुर्वेदातील व होमिओपॅथीमधील प्रत्येक वैद्यकिय व्यवसायिकाने, तसेच दंतवैद्याने आपल्या दवाखान्यात रूग्णांना सहजरित्या दिसेल व वाचता येईल अशा ठिकाणी आपले नोंदणीप्रमाणपत्र लावणे आवश्यक आहे. तथापि, याचे पालन होत नाही, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी शासन आता असे आदेश देत आहे की महानगरपालिका, नगरपरिषदा, तहसिलदार यांनी आपापल्या क्षेत्रातील वैद्यकिय व्यवसायिकांकडून याचे पालन होत आहे याची खातरजमा करावी, यासाठी कांही दवाखान्यांना यादृच्छिक भेटी (random visits) द्याव्यात व कसूरदार संबंधित वैद्यकिय अधिका-यास ७ दिवसात दवाखान्यात त्याचे नोंदणीप्रमाणपत्र लावण्याच्या सूचना द्याव्यात. ही मुदत संपल्यानंतरही, जर त्याने पूर्तता केली नाही, तर त्याचे नाव व अहवाल संबंधित वैद्यकिय परिषदेकडे ( महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल किंवा महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन किंवा महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल किंवा महाराष्ट्र डेंटल कौन्सिल) योग्य त्या कारवाईसाठी पाठवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ज. य. माने )
शासनाचे उपसचिव

प्रति,

- सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रकाच्या प्रती त्यांच्या जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना योग्य त्या कारवाईसाठी पाठवावी.
- सर्व महापालिकांचे आयुक्त,
- सर्व नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी,
- प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई,
- प्रबंधक,महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, मुंबई,
- प्रबंधक,महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल, मुंबई,
- प्रबंधक, महाराष्ट्र डेंटल कौन्सिल, मुंबई,